## Area 2a: Single Window

**14:** Establish a dedicated physical body/ bureau that functions as the sole point of contact for the purpose of setting up a business

**Response:** **Yes**

**Remarks:**


Government of Maharashtra institutionalised Maharashtra industry trade and investment facilitation cell - **'MAITRI'** on 27th February 2014 under the aegis of Industries Department. Situated at Ballard Estate - Mumbai, MAITRI is the dedicated physical body that functions as a one stop solution for all investment & Industry related information and services.

**Web link:**

http://maitri.mahaonline.gov.in

**MAITRI physical office location:**

Address: C/O Maharashtra State Small Scale Industries Development Corporation (MSSIDC), 'Krupanidhi' Building, 9, Walchand Hirachand Marg, Ballard Estate, Mumbai – 400038




**Relevant extracts of the GR :**

The Government Resolution dated 11th February 2016 (MIM 2015/PK 105 / Udyog 8) Section 2 and 7 define functions of MAITRI as a sole point of contact for all investment & Industry related information and services.

Please find annexed relevant screenshots of the Government Resolution Section 2 and 7 designating MAITRI as the State Single Window portal:

**Supporting Documents:**

उद्योगांना सर्व मंजुऱ्या एकाच ठिकाणी देण्यासाठी एक खिडकी योजना राबविणे - "मैत्री कक्ष" सक्षम करणे.

महाराष्ट्र शासन
उद्योग ऊर्जा व कामगार विभाग
मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई.
शासन निर्णय क्रमांक मेइम २०१५/ प्र.क्र. १०५/ उद्योग-८
दिनांक - ११ फेब्रुवारी, २०१६

संदर्भ:-

१) शासन निर्णय उद्योग विभाग क्र. ई-बीझ-२०१३/प्र.क्र. ११७/उद्योग-८, दि. ०१/०३/२०१४.
२) शासन निर्णय उद्योग विभाग क्र. मेइम-२०१४/प्र.क्र. ८८/उद्योग-८, दि. ०८/०१/२०१५.
३) शासन अधिसूचना सामान्य प्रशासन विभाग दिनांक - २१/०८/२०१५.
४) केंद्रीय वाणिज्य व उद्योग मंत्रालय पत्र क्र. अर्धशासकीय पत्र क्र. १०(४५)/२०१५-BEJ, दि. ०१/१०/२०१५

प्रस्तावना-

केंद्र शासनाने दि. २९ डिसेंबर, २०१४ रोजी "मेक इन इंडिया" या विषयावर आयोजित केलेल्या एका राष्ट्रीय कार्यशाळेत "व्यवसाय करणे सोपे" Ease of doing Business करण्यासाठी राज्याला घालून दिलेल्या मुदतीत अंमलबजावणी करण्याकरीता ९८ शिफारशी केल्या होत्या. "व्यवसाय करणे सोपे" करण्याच्या संबंधात जागतिक बँकेने केलेल्या सर्वेक्षण अहवाल सन २०१५-१६ मध्ये जागतिक स्तरावर देशाच्या क्रमवारीत भारताचा क्रमांक १३० वर असून या क्रमवारीत पहिल्या ५० मध्ये भारताचा क्रमांक यावा म्हणून, मा.पंतप्रधानांनी आवश्यक ते सर्व उपाय योजण्यावर भर दिला आहे. केंद्र शासनाच्या व्यापार व वाणिज्य मंत्रालयाने या संबंधात केलेल्या शिफारशींपैकी, राज्यात उद्योग उभारण्यासाठी आवश्यक मंजुऱ्या मिळवून देण्याकरीता एक खिडकी योजनेची अंमलबजावणी करणे, ही एक महत्वाची शिफारस आहे. त्यास अनुसरुन मुख्य सचिवांनी राज्यात एक खिडकी योजना राबविणे बाबत "मेक इन इंडीया" कार्यशाळेत उपस्थित मान्यवरांना आश्वासित केले आहे. मा.मुख्यमंत्री तसेच मा.मुख्यसचिव यांचे स्तरावर "मेक इन इंडीया" आणि "मेक इन महाराष्ट्र" यांच्या प्रगतीचा आढावा घेण्यात येत आहे.

जागतिक बँकेच्या व्यवसाय करणे सोपे करण्यासंबंधीच्या अहवालातील एकूण क्रमवारीत भारताचा क्रमांक वर यावा आणि "मेक इन महाराष्ट्र" या उपक्रम यशस्वी व्हावा म्हणून संबंधित उद्योग स्थापण्यासाठी आवश्यक विविध यंत्रणांकडून ना हरकते व परवाने यांच्या प्रक्रीया/ टप्पे व त्यास लागणारा कालावधी कमी करणे अपेक्षित आहे. "एक खिडकी योजना" परिणामकारकपणे राबविल्यास हा उद्देश साध्य करता येईल.

या एकात्मिक सुलभता कक्षाचे नामकरण अधिकृतपणे "महाराष्ट्र उद्योग, व्यापार आणि गुंतवणूक सुविधा केंद्र (मैत्री) " असे करण्यात आले असून तो मुंबईत दि.२७ फेब्रुवारी, २०१४ पासून सुरु झाले आहे.

उपरोक्त वस्तुस्थिती लक्षात घेता, उद्योग स्थापन करण्याकरिता सर्व ना हरकती / परवाने / मंजुऱ्या एकाच ठिकाणी उद्योजकांना तातडीने व सुलभरीत्या प्राप्त होण्याकरिता एक खिडकी योजना राबविण्याचे शासनाच्या विचाराधीन असून त्याकरिता मैत्री कक्ष सक्षम करण्याची आवश्यकता दिसून येते.

**शासन निर्णयः-**

राज्यात उद्योग स्थापन करण्याकरिता सर्व ना हरकती / परवाने / मंजुऱ्या एकाच ठिकाणी उद्योजकांना तातडीने व सुलभरीत्या प्राप्त होण्याकरिता एक खिडकी योजना राबविण्याचा शासनाने निर्णय घेतला असून त्याकरिता मैत्री कक्ष सक्षम करण्यात येत आहे.

२. **मैत्री कक्षाची जबाबदारी व व्याप्ती-**

खालील उद्दिष्टे साध्य करण्याकरीता प्रकल्पांच्या अंमलबजावणी दरम्यानचा प्रवास अधिक सुरळीतपणे पार पाडण्याची जबाबदारी मैत्री कक्षावर सोपविण्यात आली आहे: -

१) गुंतवणूकदारांना एकाच ठिकाणी संपर्क साधून सर्व मंजुऱ्या मिळवून देणे.

२)ऑन-लाईन आणि कालबध्द मर्यादेत मंजुऱ्या उपलब्ध करुन देणे.

३) प्रकल्पांच्या उभारणीदरम्यान व त्यानंतर उद्भवणाऱ्या अडचणींचे निवारण करणे

"मैत्री" व्यासपीठ सध्या राज्यातील उद्योजक उद्योगांकरीता एक माहिती/सुविधा केंद्र, तक्रार निवारण करणारी यंत्रणा म्हणून काम करीत आहे. जागतिक बँकेच्या "व्यवसाय करणे सोपे" ( Ease of Doing Business) या वर्गवारीत देशाचे मानांकन उंचावण्यासाठी आणि "मेक इन महाराष्ट्र" उपक्रम यशस्वी व्हावा तसेच उपरोक्त उद्दिष्टे साध्य करण्याकरीता "मैत्री" ची व्याप्ती आणखी वाढविण्यात येत आहे.

३. **मैत्री कक्षाच्या सेवा व अधिकार:-**

राज्यातील उद्योजकांना त्यांच्या उद्योग स्थापनेकरीता "मैत्री कक्षाची" एक प्रचलित सुविधा/तक्रार निवारण यंत्रणा एवढी मर्यादित व्याप्ती न ठेवता त्यात व्यापक सेवांचा अंतर्भाव करुन खालील विभागांच्या सेवा उपलब्ध करुन देण्याचे प्रस्तावीत आहे, त्यापुढे अस्तित्वातील मैत्री कक्षाची रचना व त्याचे अधिकार अधिक व्यापक व सक्षम करण्यात येत आहे.

राज्याचा विभाग निहाय मानांकन निर्देशांक सुधारणेसाठी सर्व विभागांशी समन्वय साधून त्यांची अंमलबजावणी करतील.

xi. एक खिडकी योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी मैत्री कक्षात समन्वय अधिकारी यांची नियुक्ती करण्याचे प्राधिकार असतील. तसेच आवश्यकतेनुसार मैत्री कक्षात सल्लागार , कंत्राटी कर्मचारी,यांच्या सेवा प्रधान सचिव (उद्योग) यांच्या मान्यतेने घेण्यात येतील. व या कंत्राटी सेवा प्रयोजनार्थ होणारा खर्च महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांच्यामार्फत करण्यात येईल.

**७. "मैत्री" कक्षामार्फत पुरविण्यात येणाऱ्या सेवा व तक्रार निवारण :-**

उद्योजकता विकासाच्या दृष्टिने एक खिडकी योजनेचा उद्देश फक्त उद्योगांना परवाने / अनुज्ञप्ति मिळण्यासाठी सहाय्य करणे इतपत सिमित न ठेवता उद्योग स्थापनेसाठी व त्याअगोदरच्या कालावधिमध्ये सर्व साधारणपणे खालील नाहरकत प्रमाणपत्र / परवानगी / क्षेत्रीय अहवाल इ.मिळविण्यासाठी उद्भवणाऱ्या अडचणी तसेच तक्रारींचा आढावा घेवून त्याचे निराकरण करण्यापर्यंत कार्यकक्षा वाढवीणे अपेक्षित आहे.

| अ.क्र. | विभाग | सेवा |
|---|---|---|
| १ | वित्त विभाग | १. उद्योग घटकांना नियमित इनपुट ट्रक्स परतावा मिळण्याकरीता पाठपुरावा<br>२. सामुहिक प्रोत्साहन योजनेंतर्गत घटकांचा विक्रीकर कर निर्धारणा |
| २ | कामगार विभाग | १. उद्योग घटकांना ४७ मुद्यांच्या अनुषंगाने ना हरकत प्रमाणपत्रे मिळण्यासाठी पाठपुरावा.<br>२. माथाडी कामगारासंबंधीत बाबी<br>३. घटकाच्या स्थलांतर/बंद होण्याबाबत ना हरकती<br>४. कंत्राटी कामगारांच्या संबंधात परवाने |
| ३ | कामगार विभाग औद्योगिक सुरक्षा व आरोग्य | १. कारखाना अनुज्ञप्ती व कारखाना बांधकाम आराखडा मंजूरी<br>२. कामगार अधिनियमानुसार उद्योग घटकांचा कामगार सेस |
| ४ | कामगार विभाग बाष्पके | १. बाष्पके अधिनियमांतर्गत घटकांची नोंदणी व नुतनीकरण<br>२. स्वयंप्रमाणीकरण व निरीक्षण संदर्भात सुधारणा विषयक बाबी |

११. वित्तीय तरतुदः-

"मैत्री" कक्षाला निधी पुरवठा राज्यशासनातर्फे दर वर्षी अंर्थसंकल्पिय तरतुदीद्वारे पुरविण्यात येईल. याकरिता स्वतंत्र लेखाशिर्ष उघडण्यात येईल, याकरिता पुरवणी मागणीद्वारे विधी मंडळास सादर करण्यात येईल. तथापि सदर कक्ष लवकरात लवकर कार्यान्वीत होण्याकरिता अंर्थसंकल्पिय तरतूदीद्वारे निधी उपलब्ध होईपर्यंत सदर कक्षाकरिता निधी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांच्याकडून घेण्यात येईल. या निधीमधुन मैत्री साठी नियुक्त केलेल्या कर्मचारी / अधिकारी यांचे मासिक वेतन व भत्ते, कार्यालयीन खर्च, वाहन / इंधन व इतर तत्सम खर्च करणे अपेक्षित आहे. सदर कक्षातील पद निर्मिती करीता वार्षिक अनावर्ती खर्च रू. १२.३६ कोटी व रू. १ कोटी अनावर्ती खर्च असा एकुण रू. १३.३६ कोटी खर्च अपेक्षित आहे.

उपरोक्त शासन निर्णय वित्त विभागाने अनौपचारिक संदर्भ क्रमांक ७३/२०१५ दि.१८.१२.२०१५ अन्वये दिलेल्या मान्यतेच्या अनुषंगाने निर्गमित करण्यात येत आहे. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१६०२१११७४३१४१६१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

Apurva Urvesh Chandra

Digitally signed by Apurva Urvesh Chandra
DN: c=IN, o=All India Services, ou=IAS, postalCode=110001, st=Maharashtra, cn=Apurva Urvesh Chandra
Date: 2016.02.11 19:09:28 +05'30'

(अपुर्व चंद्रा)
प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. मुख्यमंत्री, यांचे प्रधान सचिव महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई-३२.
२. सर्व संबंधित मा.मंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. सर्व संबंधित मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
४. मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद/विधानसभा यांचे खाजगी सचिव, विधानभवन, मुंबई.
५. सर्व विधानमंडळ सदस्य, महाराष्ट्र राज्य,
६. मा.मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
७. सर्व मंत्रालयीन विभागाचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई,
८. आयुक्त, कौशल्य विकास , रोजगार व उद्योजकता संचालनालय, कोकण भवन, नवी मुंबई,
९. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१ महाराष्ट्र , मुंबई
१०. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र नागपूर,